## जाहिरातीचा प्रारुप नमुना

# जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय,नंदुरबार

जाहिरात क्रमांक/ब/कक्ष/१/आस्था/कावि/तलाठी/पदभरती/४८२ / दि. ७ / ७ /२०११.

नंदुरबार जिल्हयातील, जिल्हाधिकारी नंदुरबार यांचे आस्थापनेवरील,उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार, / तळोदा भाग, तळोदा या उपविभागातील शासकीय कार्यालयातील गट क मधील तलाठी संवर्गातील सद्यस्थितीत रिक्त असलेली पदांवरील नियुक्तीसाठी व संभाव्य रिक्त पदांचे प्रतिक्षायादीसाठी एकत्रीत भरती साठी अर्ज दिनांक **२२/०७/२०११** अखेर **सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत म.अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,( टपाल/अभिलेख शाखा ) नंदुरबार** या पत्यावर मागविण्यात येत आहेत.

**तलाठी संवर्गातील रिक्त पदाचे आरक्षण: एकुण रिक्त पदे- २६ वेतनश्रेणी :- ५२००-२०२००- G.P.२४००/-**

| प्रवर्ग | रिक्त पदे + संभाव्य रिक्त पदांची एकुण संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग | महिला | खेळाडु | अंशकालीन उमेदवार | |
| भज क | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| भज ड | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| इमाव | २ | - | - | - | - | १ | - | - | १ |
| विमाप्र | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| खुला | २१ | ३ | १ | - | - | ६ | १ | २ | ८ |
| एकुण | २६ | ३ | १ | - | - | ७ | १ | २ | १२ |

**टिप** :- १) अतिरिक्त संवर्ग,आंतरविभागीय समायोजन,विभागीय बदली व इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी वा अन्य कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी / जास्त होणे )व आरक्षण/समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२) समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविणेत आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही.सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील एकूण पदांपैकी आहे.

- **शैक्षणिक अर्हता** : संविधानिक विद्यापीठाची पदवी
- **संगणक अर्हता** : म.ना.से. (संगणक हाताळणी/वापरण्याबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत ) नियम १९९९ च्या नियम ३ अन्वये आवश्यक अर्हता म्हणुन खालील अ किंवा ब प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासुन २ वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहिल. अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पुर्वसूचना न देता समाप्त करणेत येईल.

  **अ)** संगणक ज्ञानाविषयी D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C.किंवा O किंवा A किंवा B किंवा C यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा
  **ब)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ यांचेकडील अधिकृत एमएस-सीआयटी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र
- **वयोमर्यादा** : १)उमेदवाराचे वय जाहिरात प्रसिध्द होईल त्या दिनांकास किमान १८ व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षाची शिथिलता)

**टिप** :- महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या आणि महाराष्ट्राचा रहिवासी असलेल्या अ.जा.अनुसूचित जातीतील बौध्द धर्मांतरीत,अ.ज,वि.जा.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र आणि इमाव उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथील केली जाईल.परंतु उन्नत व प्रगत गटांमध्ये (Creamy Layer) मोडणा-या वि.जा.(अ),भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड), विमाप्र आणि इमाव उमेदवारांना ही सवलत लागू नाही.

२) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दि.२७/१०/२००९ नुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनंअंतर्गत तीन वर्ष काम केलेल्या व रोजगार व मार्गदर्शक केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या अंशकालीन पदवीधर उमेवारांना कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष पर्यंत राहिल व १० % समांतर आरक्षण लागु राहिल.

३) माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही त्यांनी सशस्त्र सेनेमध्ये केलेली सेवा अधिक ३ वर्ष आणि सेवेमध्ये कार्यरत असतांना अपंगत्व आल्यास कमाल ४५ वर्ष असेल.

४) अपंगांकरिता वय ४५ वर्षापर्यंत शिथील.(शा.नि.२६/०६/२००१)

५) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारासाठी शासन निर्णयातील तरतुदीनूसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहिल.
६) खेळाडु उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल राहील.

**परीक्षा शुल्क:-** अ) उमेदवारास खालील प्रमाणे परीक्षा शुल्क भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत रोखीने भरता येईल. यासाठी भारतीय स्टेट बँकेच्या खात्याचा तपशिल खालील प्रमाणे असेल.

खात्याचे नाव:- निवासी उपजिल्हाधिकारी नंदुरबार Resident Deputy Collector Nandurbar
खाते क्रमांक 31821234651 मुख्य शाखा नंदुरबार
IFSC Code SBINOOOO435 MICR Code 425002811

बँकेच्या भरणा पावतीची नमूना प्रत या कार्यालयाच्या संकेत स्थळावर **nandurbar.nic.in** वर अर्जासोबत प्रसिध्द केली आहे. भरणा पावतीवर उमेदवाराने त्याचे नाव लिहून भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत रक्कम रोखीने भरता येईल व प्रतिपर्ण (Counterfoil) ची मूळ प्रत अर्जाच्या पृष्ठ क्र.३ वर चिकटवून सादर करावी लागेल. प्रतिपर्णाची (Counterfoil) ची Scanned Image छायांकित प्रत स्विकारली जाणार नाही व मूळ प्रत नसलेले अर्ज विनाशुल्क म्हणुन रद्द ठरविण्यात येतील, आणि त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. परीक्षा शुल्क याशिवाय कोणत्याही पध्दतीने स्विकारले जाणार नाही.

**परीक्षा शुल्क व बँक चार्जेस प्रभार:-**
**खुला प्रवर्ग १७५/-**
**राखीव प्रवर्ग १००/-**
ब) माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू रहाणार नाही.

**अटी व शर्ती :-**

**१)आरक्षणाखालील नियुक्त्या :**
**अ)** वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज. (ड) या प्रवर्गासाठी निश्चीत केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असेल. उक्त आरक्षणाची पदे त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास वरीलपैकी इतर प्रवर्गातील योग्य उमेदवारांना नियुक्त करुन भरण्यात येतील.
**ब)** मागासवर्गीय आरक्षित पदांवरील निवड होणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीपूर्वी जाती पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
**क)** मागासवर्गीय उमेदवारांनी नजीकचे कालवधीतील सक्षम अधिकारी (उपविभागीय अधिकारी) यांनी दिलेले जात प्रमाणपत्राची छायांकित (साक्षांकित Attested )प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
**ड)** समांतर आरक्षणाखालील पदाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या प्रवर्गातील अन्य उमेदवारांमधुन सदरचे पद भरण्यात येईल.

**२) नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र :**
i) आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ४ पोटकलम २ च्या परंतूकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त निरधिसूचित जाती (विमुक्त जाती-अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) त्याचबरोबर इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गांना लागू करण्यांत आलेले आहे. त्यानुसार उपरोक्त आरक्षणाखाली अर्ज करतांना संबंधितांनी क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याचे सन २०१०-२०११ (दि.३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या अर्थिक वर्षाचे) विहीत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

ii) तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू/ महिला सदस्यांना खेळाडुंसाठी / महिलांसाठी चे आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. संबंधितांनी क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याचे विहीत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

**३) खेळाडुंसाठी अर्हता** :

अ) खेळाडु हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा व त्याला मराठीचे ज्ञान असावे.(ब)सदर खेळाडुने सेवा प्रवेशनियमातील तरतुदीनूसार पदासाठी आवश्यक आसलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.(क) एखादया खेळाडुने राज्याचे नांव उज्वल होईल अशी कामगीरी केल्याचे निदर्शनास अल्यास शैक्षणिक व वयाची अट शिथिल करुन अशा खेळाडुस योग्य अशा पदी नियुक्ती देण्याचे अधिकार शासनास राहतील.(ड) गट क व ड साठी खेळांच्या वैयक्तीक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अंजिक्य पद स्पर्धात प्रथम,द्वितीय,तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण,रौप्य,किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडु राज्य अजिंक्य पद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक ओसोशिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात.किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्या मिळविणा-या उमेंदवारास प्राधान्य देणेत येईल. वैयक्तीक रित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडुंचा यासाठी विचार करता येणार नाही.राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC) अंडर ऑफीसरची रँक मिळवुन राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.(इ) खेळाडूंकडील प्रमाणपत्र संचालक,क्रिडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडुन शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनूसार आहे किंवा नाही हे तपासून घेणेत येईल. खेळांडुसाठी वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत अट शिथील राहील.

**४) महिला उमेदवारांकरिता**:-

**अ)** खुल्या प्रवर्गातील उन्नत प्रगत व्यक्ती/कुटूंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय रहाणार नाही.

**ब)** उन्नत आणि प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) चे तत्व अनुसूचित जाती/जमाती व्यतिरिक्त सर्व प्रवर्गांना लागु असल्याने उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१०-२०११ या वर्षातील नॉन क्रिमीलेअर प्रमाणत्राची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**क)** महिलांकरीता ३० टक्के आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्राची छायांकित (साक्षांकित Attested )प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**ड)** ३० टक्के महिला आरक्षणासाठी महिला उमेदवार न मिळाल्यास त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारामधुन पद भरण्यात येतील.

**५) माजी सैनिक उमेदवारांसाठी:-**

अ) शा.सा.प्र.विभाग परिपत्रक दि.१०/१०/१९८० व दि.१६/४/१९८१ नुसार माजी सैनिक म्हणुन शासन सेवेकरीता पात्र उमेदवार असावा.

ब) शासन सा.प्र.विभाग निर्णय क्र.आरटीए-१०९०/२२/प्रक.६/९३-१२ दि.८/६/१९९३ मधील तरतुदीनुसार माजी सैनिक उमेदवाराने माजी सैनिक या समांतर घटकाचा आरक्षणाचा पुर्वी लाभ घेऊन शासकिय सेवेत नौकरी स्विकारली असेल तर त्यास संमातर आरक्षणाचे लाभास पात्र राहणार नाही. तो केवळ वयाची सवलत घेण्यास पात्र राहिल.

**६)** अंशकालीन उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्याच उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

**७) पसंतीक्रम** : पदे भरतांना स्वातंत्र्य सैनिक / त्यांचे नामनिर्देशित, संपकालीन कर्मचारी, १९८१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९१ चे कार्यमूक्त जनगणना कर्मचारी, या क्रमाने पसंतीक्रम राहील. ( गुणवत्ता यादी मध्ये जर एकापेक्षा जास्त उमेदवार एकाच क्रमांकावर असतील तर पसंतीक्रमाच्या प्राथम्यानूसार उमेदवाराची निवड केली जाईल.)

**८)** महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ व शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दि.२८ मार्च २००५ अन्वये उमेदवारांना लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्राच्या नमुना-अ मध्ये प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.सदरचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल.

**९)** मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.(अर्जासोबत अधिवास प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे )

**१०)** शासन निर्णय क्रमांक अनियो-१०५/१२६/सेवा-४/दिनांक ३१/१०/२००५. मधील तरतुदीनूसार दिनांक १/११/२००५ नंतर नियुक्तीसाठी पात्र ठरणा-या कर्मचा-यांना नवीन परिभाषीत अशंदान निवृत्ती योजना लागू राहील.मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्त वेतन योजना( म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अशंराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

**११)** जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची सांक्षाकित छायांकीत प्रत जोडावी.

**१२)** न्याय प्रविष्ठ प्रकरण,फौजदारी,शिस्तभंगविषयक,वा तत्सम इत्यांदी कार्यवाही संबंधिची माहिती अर्जातील संबंधित परिच्छेदात नमुद करावी.नमुद केलेल्या माहितीमध्ये अर्ज सादर केल्यापासुन निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल उमेदवाराने कळविणे आवश्यक राहील.ही माहिती न दिल्यास तसेच त्यात नंतर घडुन आलेले बदल उमेदवाराने न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यानंतर रद्द करण्याचे अधिकारी नियुक्ती प्राधिकारास राहतील.

**१३)निवडीसाठीची कार्यपध्दती** :

अ) तलाठी संवर्गातील पदांसाठी उमेदवारांची निवड करतांना फक्त लेखी परीक्षा घेण्यात येईल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवुन एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड यादी तयार करण्यात येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

ब)वरील पदे सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक न्याप्र.१००३/९९/प्र.क्र.२/०३ (भाग-२) १६-अ दि. २५ ऑक्टोंबर २००५ मध्ये नमूद सेवा भरतीची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन तसेच गट ड बाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२००४-२००४/प्र.क्र.१२/०४/बारा दि. ७ जुन २००४ अन्वये त्यानुसार सामाजिक आरक्षण / समांतर आरक्षण तसेच अनारक्षित / खुल्या पदांवरील उमेदवारांची निवड करण्यात येईल.

उमेदवारांना समान गुण मिळाल्यास परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. २७ जुन २००८ मधील निकषानुसार क्रम लावला जाईल

क)जाहिरातीत नमूद केलेल्या पदाकरिता निवड केलेल्या उमेदवारांना जसजशी पदे रिक्त होतील त्याप्रमाणे नियुक्त्या देण्यात येतील. तसेच जिल्हयातील उपविभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या कार्यालयात नियुक्तीस पात्र राहील.

ड) उमेदवारास कागदपत्रे पडताळणीसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल, प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

**१४) अर्ज कसा करावा :**

अ) उपरोल्लेखीत नमुन्यात ३० x २० से.मी. आकाराच्या पांढ-या जाड कागदावर हस्तलिखित / टंकलिखित/चक्रमुद्रित किंवा संगणकीकृत करुन अर्ज सादर करावा. त्यावर पासपोर्ट आकाराचा अलिकडच्या काळातील काढलेला स्वत:चा फोटो, अर्जावर चिकटवून त्यावर स्वाक्षरी करावी. टपालाने अर्ज पाठवितांना भारतीय टपाल सेवेमार्फत पाठवावा.

ब) अर्ज मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती,तथा जिल्हाधिकारी,नंदुरबार यांचे नावे करावा. लिफाफ्यावर तलाठी पदासाठी अर्ज याचा स्पष्ट उल्लेख करावा. परीक्षा शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. माजी सैनिकांच्या अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची अट लागु नाही.याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

क) अर्जदाराने अर्जासोबत परीक्षा शुल्क अदायगी बाबत भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत रोखीने भरणा केलेल्या प्रतिपर्ण (Counterfoil) ची मूळ प्रत तसेच खालील प्रमाणपत्रांच्या सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या साक्षांकित (Attested) छायांकित प्रती, जोडणे आवश्यक आहे.

१)शाळा सोडल्याचा दाखला ( जन्मतारीख पडताळणीसाठी ) २)संविधानिक विदयापीठाची पदवी प्रमाणपत्र ३)गुणपत्रक ४) आवश्यक संगणकीय ज्ञानासंबंधी तांत्रिक अर्हता प्रमाणपत्र ५)जातीचा दाखला व असल्यास जाती पडताळणी प्रमाणपत्र. ६)समांतर आरक्षणातील ( माजी सैनिक / अपंग ) तसेच प्राधान्यक्रमातील स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशित / संपकालीन कर्मचारी / जनगणना कर्मचारी / अंशकालीन कर्मचारी यांनी दाव्याचे पृष्ठयर्थ सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र ७)महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र ८)लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ९) अनुभवाचे प्रमाणपत्र असल्यास इ.

**१५)** विहित किमान अर्हता धारण करणा-या पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात व वरील आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज मागविण्यात येत असून अर्जदार हा पात्र असल्यास त्यांनी **दि. २२ / ०७ /२०११** पावेतो जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार ( टपाल शाखा ) येथे समक्ष दयावेत अगर पोष्टाद्वारे पाठवावेत, मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांवर विचार केला जाणार नाही.

**१६) खालील प्रकारचे अर्ज सदोष गणले जातील व त्यांचा विचार करण्यात येणार नाही.**

अ)अर्जासोबत परीक्षा शुल्क अदायगी बाबत भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत रोखीने भरणा केलेल्या प्रतिपर्ण (Counterfoil) ची मूळ प्रत नसलेले ब)विहित पात्रता धारण न करणारे क) मजकूर चुकीचा किंवा अपूर्ण भरलेले अर्ज ड )उमेदवाराची स्वाक्षरी नसलेले अर्ज. इ) अर्ज स्विकृतीचा शेवटचा दिनांक **दि.२२ /०७/२०११** रोजी सायंकाळी ६ नंतर

कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज. ( टपाल खात्याच्या दिरंगाईमुळे किंवा अन्य आपत्कालीन परिस्थितीमुळे विलंब झाल्याचे कारण ग्राहय धरणेत येणार नाही ) इ)उमेदवाराचे छायाचित्र ( फोटो ) स्वस्वाक्षरीत केला नसल्यास फ) प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित (Attested ) केलेले नसल्यास.

**१७)** एकदा नाकारण्यात आलेल्या अर्जाबाबत पुनर्विचार केला जाणार नाही. त्यासंबंधी कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेतली जाणार नाही. पदभरती प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. व असा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

**१८)** उमेदवाराने अर्जामध्ये नमुद केलेली माहिती चुकीचा वा खोटी आढळुन आल्यास, सदर उमेदवार दंडात्मक व फौजदारी कार्यवाहीसाठी तसेच त्या आधारे नियुक्ती झाल्यास सेवेतुन काढण्यास पात्र राहील.

**१९)** शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयप्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवागनीची प्रत अर्जासोबत जोडावी.

**२०)** अर्जाबाबत उमेदवार समवेत कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही.तसेच उमेदवाराने अर्जासोबत कोणत्याही प्रमाणपत्राच्या मूळ प्रती जोडु नयेत.मूळ प्रती जोडल्यास व त्या गहाळ झालेस त्यास जिल्हाधिकारी कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**२१)** एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा तसेच निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल व काही प्रशासकिय/तांत्रिक अडचण उदभवल्यास निवड स्थगित किंवा रद्द करण्याचे अंतिम निर्णय इ.बाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समितीने राखून ठेवले आहेत.

**२२)** अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीचा वा खेटी आढळल्यास सदर उमेदवार दंडात्मक कारवाईसाठी तसेच त्याआधारे नियुक्ती झाल्यास सेवेतून काढण्यास पात्र राहील. अर्जदाराने अर्जात दिलेल्या माहितीनुसार त्यास परिक्षेसाठीचा प्रवेश हा पुर्णतः त्याची पात्रता तपासण्याचा अधिन राहुन दिला जाईल. परीक्षा उत्तीर्ण होऊनही अर्जदार जर पात्रतेच्या अटी, अर्ज सादर करण्याच्या दिनांकापर्यंत पुर्ण करीत नसेल असे आढळल्यास त्याची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होण्यास पात्र असेल व त्यास त्याचा दावा सांगता येणार नाही. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

**२३)** विहीत नमुन्यात नसलेले अर्ज,विहीत शुल्क अदायगी निर्देशानुरुप न केलेले अर्ज, विहीत पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, फोटोवर स्वस्वाक्षरी न केलेला अर्ज, अशा प्रकारचे अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**२४)** छाननीमध्ये अपात्र ठरविण्यात आलेल्या अर्जदारांना त्यांनी अर्जासोबत भरलेले शुल्क परत मिळणार नाहीत. या जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील, अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.तसेच विहीत मुदतीतनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेय यासंबंधाने उमेदवारासमवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. टपालाने विलंबाने प्राप्त झालेली लिफाफे उघडण्यात येणार नाहीत. प्राथमिक छाननीत नाकारलेल्या अर्जदाराला पोस्टाव्दारे कळविणेत येईल. ई-मेल अड्रेस अर्जासोबत दिल्यास अर्ज स्विकृती/नाकारलेबद्दल कळविणेत येईल.

**२५) निवडसुचीची कालमर्यादा :** उपरोक्त पदांसाठी जाहीर करण्यात येणारी निवडसुची / प्रतिक्षायादीची मुदत एक वर्षासाठी किंवा निवडसुची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल.

**२६)** लेखी परिक्षेसाठी संभाव्य तारीख दि.३१/७/२०११ असेल तलाठी पदासाठी अटी व शर्ती, विहीत अर्जाचा नमुना व सविस्तर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या **nandurbar.nic.in** या संकेतस्थळावर( वेबसाईटवर ) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच नंदुरबार जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालय व उपविभागीय कार्यालये येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे व तेथेही प्रत मिळेल.

ठिकाण :- नंदुरबार
दिनांक :- ०७ / ०७ /२०११.

स्वाक्षरीत/-
सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, नंदुरबार

स्वाक्षरीत/-
अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी,नंदुरबार

<u>**अर्जाचा प्रारुप नमुना**</u>

| |
|---|
| अर्जदाराने स्वस्वाक्षरीत केलेला स्वत:चा फोटो येथे चिकटवावा. |

प्रति,
**मा.अध्यक्ष,जिल्हा निवड समिती,**
**तथा जिल्हाधिकारी नंदुरबार**

विषय:-... ... ... ... ... ... ... ... ... या पदासाठी अर्ज.

आपलेकडील जाहिरात क्र./ब/कक्ष/१/आस्था/कावि/ /पदभरती/२०११ दि. / /२०११.

जातीचा प्रवर्ग ----------------- समातंर आरक्षण -----------------------

१. **संपूर्ण नांव** : आंडनांव स्वत:चे नांव वडिलांचे /पतीचे नांव
**मराठीत :** ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

**इंग्रजीत :** ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

२. **पत्रव्यवहाराचा पत्ता ( पिनकोडसह )**
**मराठीत** : ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

**इंग्रजीत** : ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

३. **जन्मतारीख**... ... ... ... . दि. / /२०११ रोजी वय ... .....वर्ष... ..महिने... ... ...दिवस ,,,,

४. **लिंग :-** पुरुष / स्त्री ☐ राष्ट्रीयत्व :- भारतीय / अभारतीय ☐

५. **जात / पोटजात तपशिल :-**

६. **जातीचा प्रवर्ग :-** खालील चौकोनात √ अशी खुण करावी.

| अनु.जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विमाप्र | इतर मागास वर्ग | सर्व साधारण (खुला) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

**७.समातंर आरक्षणाचा प्रकार** - योग्य रकान्यात √ अशी खुण करा.

| माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग | महिला | खेळाडु | अंशकालीन पदवीधर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**टिप -**
१) माजी सैनिक म्हणजे स्वत: उमेदवार माजी सैनिक असावा,त्यांचे नातेवाईकाला माजी सैनिक आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

२) खेळाडु म्हणजे राष्ट्रीय/राज्य स्तरावर खेळांच्या वैयक्तीक अथवा सांघीक क्रिडा स्पर्धामध्ये प्रथम,व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण,रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडु असावा.

३) समांतर आरक्षणाच्या ठिकाणी फक्त एकाच ठिकाणी √ अशी खुण करावी. उमेदवाराने दोन ठिकाणी √ अशी खुण केल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

**खालील मुद्दयावर योग्य त्याठिकाणी √ अशी खुण करावी.**

८ उमेदवार विवाहीत आहे की अविवाहीत अविवाहीत / विवाहीत

**खालील मुद्दयांवर होय/ नाही असे स्वहस्तक्षरात स्पष्ट लिहावे**

९ अर्जदार महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय ..................

१० अर्जदार स्वातंत्र्य सैनिकाचा पाल्य आहे काय ..................

११ अर्जदार पदवीधर अंशकालीन कर्मचारी आहे काय ..................

१२ अर्जदार पदवीधन अंशकालीन कर्मचारी असल्यास रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात अनुभवाची नोंद केली आहे काय ..................

१३ अर्जदार १९९१ चे जनगणना कर्मचारी आहे काय ..................

१४ लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय ..................

१४ उमेदवार माजी सैनिक आहे का ..................

१५ जाती वैधता प्रमाणपत्र आहे काय ? ..................

१६. **क्रीमीलेयर प्रमाणपत्र आहे काय ?** ... ... ... ...

(वि.जा.भ.ज., विमाप्र, इमाव या सामाजिक आरक्षणासाठी व खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणासाठी अर्ज करणा-याउमेदवारांनी नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.)

१७ **शैक्षणिक पात्रता**

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | संस्थेचे नाव/बोर्ड/ विदयापीठ | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पदवी | | | | | |
| २ | पदव्युत्तर | | | | | |
| ३ | इतर | | | | | |

१८ **संगणकीय अर्हता व इतर गुणवत्ता/अर्हता**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | अर्हता | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

१९जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड/ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र/समाजकल्याण कार्यालय यांचेकडे नाव नोंदणी केली आहे काय — होय/ नाही

नाव नोंदणी केली असल्यास नोंदणीचा तपशिल — नोंदणीचे ठिकाण ... ... ... ...

नोंदणी क्रमांक व वर्ष ... ... ... ...

नुतनीकरणाचा दिनांक ... ... ... ...

**२० परीक्षा शुल्क अदायगीचा तपशिल:-**

बँक- भारतीय स्टेट बँक शाखा-----------------------------------------------र.रु. प्रतिपर्ण (Counterfoil) वर बँकेचा स्क्रोल क्रमांक कृपया भरणा पावतीच्या प्रतीपर्णाची (Counterfoil) मुळ प्रत यापृष्टाच्या मलपृष्टावर चिकटवावी.

मी शपथपुर्वक लिहुन देतो / देते की,जिल्हाधिकारी नंदुरबार यांची कार्यालयाची ------------- पदभरतीची जाहीरात मी काळजीपुर्वक वाचली आणि मला समजली.सदर पदासाठी जाहीरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची मी पूर्तता करतो/करते की,याची मी खात्री केली आहे.या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळल्यास त्याच माहितीच्या अधारे मला निवड प्रक्रियेत दिलेला प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल,परिणामी मिळालेली नोकरी गमविण्यास मी बांधील राहील व पुढील योग्य त्या कारवाईस पात्र राहील याची मला जाणीव आहे.तसेच प्रमाणपत्र पडताळणी साठी मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक असल्याची मला जाणीव आहे.

स्थळ :-

दिनांक :- ( अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी )

**महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना - अ**

**<u>प्रतिज्ञापत्र</u>**

**( नमुना - अ ( नियम ४ पहा )**

मी, श्री / श्रीमती .... .... .... .... .... .... .... .... .... श्री . .... .... .... .... .... .... .... .... .... .... .... .... .... .... यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय .... .... वर्ष रा. .... .... .... .... .... .... .... .... .... .... .... .... .... याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी .... .... .... .... .... .... .... .... .... .... या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला .... .... .... (संख्या ) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दि. २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या <u>.... ....</u> इतकी आहे. ( असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

१. .... .... .... .... .... .... ....

२. .... .... .... .... .... .... ....

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दि. २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- **अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी**

( टीप : सदरचे प्रतिज्ञापत्र सर्व उमेदवारांनी भरुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. )

PAC/10/09/-25,00,000 SLIPS

## State Bank of India
भारतीय स्टेट बैंक

________ Branch शाखा

Date दि. ________ 200__

A/C. No. 3 1 8 2 1 2 3 4 6 5 1

For the Credit of Resident Deputy
के खाते में जमा करने हेतु Collector, Nandurbar

Amount (in words) Ruppes ________
रु. (शब्दो में) ________

| Details of Cash/Cheques रोकड / चेकों का विवरण | Rs. रु. | P. पै. |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| कुल रुपये Total Rs. | | |

| Cashier रोकडिया | Cash/Passing Officer रोकड / पासकर्ता अधिकारी |
|---|---|
| | |

उमेदवाराचे नाव

Item Code No. 2470017

---

## State Bank of India
भारतीय स्टेट बैंक

________ Branch शाखा

CA/SB/RD/CC/DL/TL Account Pay-in-Slip
चालु/बचत/आवर्ती जमा खाता/केश क्रेडीट/मांग ऋण/सावधि ऋण खाता जमा पर्ची

Date दिनांक ________ 200__

NOTE : Please use separate slip for depositing Cash and Cheques, Drafts etc.
नोट : कृपया नकद तथा चेक ड-ाफ्ट आदि को जमा करने हेतु अलग पर्ची का उपयोग करें

For the Credit of the Account of (Name) Resident Deputy
के खाते में जमा करने हेतु (नाम) Collector Nandurbar

Amount (in words) Rupees ________
रु. (शब्दो में) ________

Instalment for * के लिए किस्त *

A/C No. खाता क्र. 3 1 8 2 1 2 3 4 6 5 1

PARTICULARS OF विवरण — CHEQUES चेक्स / CASH नगद

| Drawn on Bank अदाकर्ता बैंक | Branch शाखा | Cheque No. चेक नं. | Cash notes रोकड नोट | Amount राशि Rs. रु. | P.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | | | X 1000 | | |
| | | | X 500 | | |
| नमुना भरणा | पावती | | X 100 | | |
| | | | X 50 | | |
| | | | X 20 | | |
| | | | X 10 | | |
| | | | | | |
| | | | Coins सिक्के | | |
| | | | Total Rs. कुल रु. | | |

| Cashier's Scroll No. रोकडिया/सारणी क्र. अंतरण | Cashier रोकडिया | Cash Officer Passing Officer रोकड/पासकर्ता अधिकारी | Jotting Book सूची वही | Partition No. विभाजन क्र. | Deposited by (Signature) जमाकर्ता के हस्ताक्षर |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | भरणा करणाऱ्याचे नाव लिहावे |

* IF APPLICABLE * यदि लागू हो तो लेखापालास विनंती कृपया भरणा करणाऱ्याचे नाव संगणकात नोंदवावे